# मानवतावाद आणि नवे शतक

**वैचारिक**

जागतिक अशांततेने सुरू झालेल्या या चालू शतकात, मानवतावादा'ची संजीवनी ही शांततेसाठी अतिशय उपयुक्त ठरू शकते, असा विश्वास मानवतावादी चळवळ पुढे नेणारे विचारवंत व्यक्त करीत आहेत. कारण मानवतावादाचे बीज हे, मानवाच्या 'मानव' म्हणून असणाऱ्या प्रतिष्ठेभोवती, त्याच्या विचारस्वातंत्र्याभोवती रूजले आणि पुनरूज्जीवनाच्या कालखंडात (१४ वे ते १६ वे शतक) त्याची जोमाने वाढ झाली. पुनरूज्जीवनाच्या काळाचा केंद्रबिंदू मानवतावाद हा होता. या काळात व्यक्तीची वैचारिक प्रगती, ज्ञानाचा विकास यांचे महत्त्व होते. त्यापूर्वी राजेशाही, धर्मसंस्था आणि सरंजमशाही यांनीच मानवी जीवनाचा, व्यवहाराचा ताबा घेतला होता. मानवाची स्वतंत्र विचारशक्तीच जणू या त्रयींनी हिरावून घेतली होती. पण मानवतावादाला धरून असलेल्या ज्ञानाच्या क्षेत्रातील या पुनरूज्जीवनामुळे जगाचा चेहरामोहरा बदलू लागला. याच काळात धार्मिक सुधारणाही (पुनरूत्थानाचा काळ) झाल्या. तेव्हा या दोन्ही चळवळी परस्परांना पूरक ठरल्या होत्या.

त्यानंतर झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य आणि समतेचा संदेश जगाला दिला. मग कृषी क्षेत्रात परिवर्तन घडून आले. त्यानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीने आणि सध्या चालू असलेल्या वैज्ञानिक क्रांतीने जगाचा कायापालटच केलेला दिसतो. पुनरूज्जीवनाच्या इतिहासाला, आज सुमारे पाचशे वर्षे लोटूनही एक विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेले दिसते. कारण, जागतिकीकरणाच्या या युगात 'मानवतावाद' हा विषय पुन्हा एकदा चर्चेचा, व्यवहाराचा केंद्रबिंदू ठरतो आहे.

'एकविसाव्या शतकातील मानवतावाद' या व तत्संबंधी नैतिक मूल्ये इ. विषयांवर, अलीकडे अनेक विचारवंतांनी आपल्या भाषणांत भर दिला आहे. 'अमेरिकन युमॅनिस्ट असोसिएशन' च्या एका कार्यक्रमात, या विषयातील एक विचारवंत बाबू गोजिनेनी यांनी, मानवतावादी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केलेल्या विचारांचा हा सारांश.

आज या नव्या शतकाच्या संदर्भात आपण मानवतावादाचा विचार करतो तेव्हा, तर्काधिष्ठित विचारांवर आधारित आणि श्रद्धा व अंधश्रद्धा यांपेक्षा वैश्विक प्रक्रियेत नैसर्गिक असणारी, एक आधुनिक जीवनव्यवहार-पद्धत आपल्याला अपेक्षित असते. समाजाचा एक घटक म्हणून आणि एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून, मानवी मूल्यांवर आधारित, धर्म-पंथनिरपेक्ष मानवीसमाजाचे अस्तित्व आपल्याला गरजेचे वाटते. आजच्या काळातील स्वातंत्र्य आणि लोकशाही या संकल्पनांचा भक्कम पाया हा या मानवतावादाचा आहे. आपण स्वतःला मानवतावादी म्हणवतो तेव्हा, आपले विचार व कृती यांमध्ये मानवतावादाची मूल्ये असतील, याबद्दल आपण जागरूक असतो, असायला हवे. मानवतावादी व्यक्ती, कोणतीही गोष्ट केवळ देवा-धर्माने म्हटले म्हणून किंवा कुणाच्या विशिष्ट अधिकारापोटी मान्य करीत नाहीत. चौकस, जागरूक व विचारी मनाला मानवतावाद उचलून धरतो; त्याचबरोबर विचार-स्वातंत्र्याबरोबर येणारी जबाबदारी व त्यायोग्य कृती करणे यालाही

मानवतावादात फार महत्त्व आहे. म्हणजेच मानवतावादासाठी जबाबदार वैश्विक नागरिकत्व हे अत्यंत आवश्यक आहे.

मानवतावादाला निधर्मी किंवा सेक्युलर समाज व राष्ट्र यांची अपेक्षा असते. यात केवळ प्रशासन किंवा सरकारी व्यवहार यांची धर्म-पंथांपासून फारकत अपेक्षित नसते तर, नागरिकांच्या दैनंदिन समाजव्यवहारातही धर्म-पंथ डोकावू नये, असे अपेक्षित असते. या धर्म-पंथनिरपेक्षतेमधून मानवतावादाचा प्रवास आपोआप पुढेपुढे जात असतो. या प्रवासात, आपण, म्हणजे मानव कोण आहोत? आपले विश्व कसे तयार झाले? जीवन म्हणजे काय ? मग चांगले जीवन कसे असते? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न कळत-नकळत घडत जातो. या काही प्रश्नांची उत्तरे धर्म-पंथांनीही दिली आहेत. मग मानवतावाद हा अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो म्हणजे हा पण एक धर्म-पंथ आहे का? मानवतावाद हा आध्यात्मिक, वांशिक आहे का ? किंवा सर्वसामान्यांना न समजणारी, रूजणारी काही अलौकिक विचारधारा आहे का ? अशा प्रश्नांना मानवतावाद्यांना सामोरे जावे लागते. या प्रश्नांच्या अनुषंगाने मानवतावाद आपण समजून घेणार आहोत.

धर्म-पंथांनी विचार केलेल्या काही प्रश्नांचा विचार मानवतावाद पुन्हा करतो हे खरेच आहे. पण म्हणून मानवतावाद हा धर्म-पंथ ठरत नाही. कारण, अशा प्रश्नांची उत्तरे शोधणे हा तत्त्वज्ञानाचा भाग आहे. तत्त्वज्ञान म्हणजे धर्म-पंथ नव्हे. मानवतावादाला या प्रश्नांच्या उत्तरातून सत्याचा शोध घ्यायचा आहे. कोणत्याही धर्माचे स्थान बळकट करायचे नाही किंवा कोणताही धर्म उचलून धरायचा नाही. सत्याचा शोध घेताना सतत वेगवेगळे प्रश्न मनात येणे हेही स्वाभाविक आहे. विश्वाची रचना आणि मानवाचे त्यातील स्थान, याबाबतचे सत्य शोधणे हे तर मानवतावादासाठी महत्त्वाचे आहेच. पण मानवतावाद त्या सत्याला कवटाळून बसणार नाही. त्या सत्याच्या आधारे एका किंवा काही व्यक्तींचे नव्हे तर, संपूर्ण मानवी समूहाचे जीवन आणखी चांगले व्हावे, यासाठी मानवतावाद प्रयत्न करेल. तसेच विश्वाची रचना फक्त मानवी जीवन वा मूल्ये यांना केंद्रस्थानी ठेवून झाली आहे, असा काही समज मानवतावादात नाही. त्यामुळे मानवतावाद हा मानववंशकेंद्रित नाही.

___ मानवतावादी असणे म्हणजे सौंदर्याचे, कलेचे कौतुक वा जाण नसणे असा समज काही ठिकाणी पसरलेला आढळतो. मानवतावाद हा तर्काधिष्ठित व विज्ञानाला धरून असणार आहे. विज्ञान हे ज्ञानाचा शोध घेते. ज्ञान हेच सत्य आहे आणि सत्याचे सौंदर्य हे सौंदर्यातील सत्याइतकेच शाश्वत आहे. विश्वाची कलात्मक रचना, त्यातील सौंदर्य आणि त्यामधील वैज्ञानिक नियम समजून घेऊ न, त्या लयीत आपली लय मिसळून जीवन जगणे, हे जीवनातील सौंदर्य समजून घेणे जर मानवतावादाला शक्य होत असेल, तर मानवतावाद हा सौंदर्याला, कलेला महत्त्व देणारा नाही असे कसे म्हणता येईल ?

मानवतावाद हा जीवनातील चांगल्या बाजूंना उचलून धरणारा आहे; तो नकारात्मक नाही, म्हणून त्याने धर्म-पंथांवर टीका करू नये, असे म्हणणारा एक गट आहे. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, मानवतावाद हा कोणत्या विशिष्ट धर्म-पंथावर टीका करीत नाही. तर त्यामागील विचारांना, समजुतींना मानवतावादाच्या निकषांवर तपासून पाहात असतो. त्यात असमानता, विषमता आणि तर्कदुष्टता आढळली तर मानवतावाद ते नाकारतो. पण ते विचार कवटाळून बसणाऱ्या नागरिकांचा 'विचाराचा हक्क' मात्र मानवतावाद नाकारत नाही. त्यामुळे मानवतावादाची यासंबंधीची टीका ही धर्म-पंथ यांना उद्देशून नसते.

मानवतावादी देव मानत नाहीत मग ते मानवाधिकार कसे मानतात? असा प्रश्न कधीकधी उपस्थित केला जातो. याचे उत्तर असे की, देवावर विश्वास ठेवणे अथवा न ठेवणे याचा मानवतावादाशी संबंध येत नाही. मानवाचे 'मानव' म्हणून असणारे अधिकार मान्य करताना, मानवाची 'मानव' म्हणून असणारी प्रतिष्ठा व स्थान हे महत्त्वाचे असते. देवावर विश्वास ठेवत नाही म्हणून, मानवतावाद मानवाधिकार मानतो, असे नाही. आणखी एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, विज्ञान जर अतिशय उपयुक्त आणि आश्चर्यकारक आहे तर मग, विज्ञानाला धरून मानवाने, निसर्गातील आपल्या सहकाऱ्यांबरोबर शांततेने, सहकार्याने कसे राहायचे? या प्रश्नाच्या उत्तरात मानवाच्या स्वातंत्र्याच्या मर्यादेचा अर्थ आपल्याला समजून घ्यायला हवा आहे. मानवतावाद हा मानवाला विश्वातील 'मानवा' चे स्थान समजून घेण्यासाठी मदत करतो आणि त्यासाठी विज्ञानाची मदत घेतली जाते. विश्वाच्या रचनेतील प्रत्येक कणाचे असे एक स्थान असते, कार्य असते. त्यात हस्तक्षेप करून मानवाने आपल्या स्वातंत्र्याची मर्यादा ओलांडली की एक असमतोल निर्माण होऊ शकतो. म्हणून मानवाने आपले ज्ञान व वैश्विक रचनेतील आपले मर्यादित स्वातंत्र्य या दोहोंचा मेळ घातला पाहिजे. विज्ञानाने आपल्याला शक्ती दिली, ज्ञान दिले म्हणून त्याचा दुरूपयोग करून विश्वरचनेला बाधा आणण्याचा प्रयत्न धोक्याचा ठरू शकतो.

अखेरीस आपण असे म्हणू शकतो की, मानवतावादाचे सामर्थ्य विश्वाची नैसर्गिक रचना समजून घेण्यात, आवश्यक तिथे विज्ञानाची कास धरण्यात, नैतिकता व स्वातंत्र्य जपण्यात, लोकशाही तत्त्वांना उचलून धरण्यात, मानवामानवामध्ये व मानव-निसर्ग संबंधांमध्ये सहकार्य घडवून आणण्यात आणि निसर्गाचे शाश्वत सौंदर्य कायम राखण्यात आहे.

या सामर्थ्याचा आविष्कार आपल्याला नव्या शतकात आढळतो का? याचे उत्तर दुर्दैवाने नाही असेच द्यावे लागते. कारण, आजचे जग विषमतेने भरलेले आहे. जगाचा एक पंचमांश भाग असलेले पश्चिमेकडील देश हे बहुतांश क्षेत्रांत आघाडीवर आहेत. जागतिक पातळीवरील एकूण दरडोई उत्पन्नाचा तीन चतुर्थांश भाग हा पश्चिमेकडे वळतो. तरी बौद्धिक संपदा कायदा लागू करून, पूर्वेकडील अनेक प्रकारचे विज्ञान उदाहरणार्थ, औषधी वनस्पती इत्यादींवर ताबा मिळविण्याचा पश्चिमेचा प्रयत्न आहे. जागतिकीकरण ज्या वेगाने होत आहे आणि जागतिक व्यापार संघटना ज्या वेगाने इतर देशांना आपल्यात सामावून घेत आहे ते पाहता ही विषमता आणखी वाढण्याचीच लक्षणे आहेत. दुसरीकडे धार्मिक, वांशिक दंगली आणि संघर्ष हेही मोठया प्रमाणावर वाढताहेत. लहान मुले, स्त्रिया आणि गरीब हे सर्वच यांत भरडले जात आहेत. अशा परिस्थितीत मानवतावादाने पुन्हा एकदा जोमाने उभे राहण्याची गरज आहे. मानवतावादाचे सामर्थ्य हे लोकांपर्यंत पोचविण्याची गरज आहे. मानवतावाद हाच जगाला सर्व प्रकारच्या मानवी आपत्तीपासून वाचवू शकतो, असा विश्वास आपण आपल्यामध्ये व इतरांमध्ये निर्माण करण्याची गरज आहे.

❖